भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

# हज समिती अधिनियम, २००२

**(सन २००२ चा अधिनियम क्रमांक ३५)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Haj Committee Act, 2002

**(Act No. 35 of 2002)**

[ *As in force on the 6th August, 2006* ]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

**[किंमत :** रुपये ३७.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि हज कमिटी ॲक्ट, २००२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर, २००६ यात पृष्ठ ११६ ते १२८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर, २००६.

**टी. के. विश्वनाथन्,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The Haj Committee Act, 2002 as on the 6th August 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November 2006 on Pages 116 to 128.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 9th November, 2006.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# हज समिती अधिनियम, २००२

## कलमांचा क्रम

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**कलमे**

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या .

प्रकरण दोन

**भारतीय हज समिती**

३. भारतीय हज समिती घटित करणे व तिचे विधिसंस्थापन करणे.

४. समितीची रचना.

५. सदस्यांची अधिसूचना.

६. पदावधी.

७. अध्यक्ष व उपाध्यक्ष.

८. समिती पुनर्घटित करणे.

९. समितीची कर्तव्ये.

१०. समितीच्या सभा.

११. स्थायी समित्या व उपसमित्या नियुक्त करणे.

१२. समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याबाबतची किंवा सदस्य असण्याचे चालू राहण्याबाबतची अपात्रता.

१३. अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांचा राजीनामा.

१४. अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांना पदावरून काढून टाकणे.

१५. नैमित्तिक रिक्त जागा भरणे.

१६. मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर कर्मचारी.

प्रकरण तीन

**राज्य हज समित्या**

१७. राज्य हज समिती घटित करणे व तिचे विधिसंस्थापन करणे.

१८. राज्य समितीची रचना.

१९. सदस्यांची अधिसूचना.

२०. पदावधी.

२१. अध्यक्ष.

२२. राज्य समिती पुनर्घटित करणे.

२३. समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यास किंवा सदस्य असल्याचे चालू राहण्यास अपात्रता.

२४. अध्यक्ष व सदस्य यांचा राजीनामा.

२५. अध्यक्ष व सदस्य यांना पदावरून काढून टाकणे.

२६. नैमित्तिक रिक्त जागा भरणे.

२७. राज्य समितीची कर्तव्ये.

२८. राज्य समितीची सभा.

२९. राज्य समितीचे कार्यकारी अधिकारी व इतर कर्मचारी.

प्रकरण चार

**वित्तव्यवस्था, लेखा आणि लेखापरीक्षा**

३०. केंद्रीय हज निधी.

३१. केंद्रीय हज निधीचे उपयोजन.

३२. राज्य हज निधी.

३३. राज्य हज निधीचे उपयोजन.

३४. लेखा आणि लेखापरीक्षा.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

३५. यात्रेकरू-परवाने देण्याचे व फी आकारण्याचे समितीचे अधिकार.

३६. समितीचे निष्प्रभावन.

३७. समितीच्या किंवा राज्य समितीच्या सदस्याचे पद हे लाभाचे पद न ठरणे.

३८. पदे रिक्त असणे इत्यादींमुळे समितीची कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

३९. समितीचे अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

४०. हानिरक्षण.

४१. अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

४२. गाऱ्हाणी दूर करणे.

४३. मालमत्ता व इतर हक्क इत्यादी, समित्यांकडे निहित असणे.

४४. नियम करण्याचा अधिकार.

४५. उपविधी करण्याचा अधिकार.

४६ प्रत्यायोजन करण्याचा अधिकार.

४७. नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

४८. या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अस्तित्वात असलेल्या समितीच्या कर्मचाऱ्यांबाबत तरतुदी.

४९. सद्भावनापूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.

५०. अडचणी दूर करण्याचा अधिकार.

५१. निदेश देण्याचा अधिकार.

५२. निरसन.

**अनुसूची**

इंग्रजी-मराठी शब्दसूची

मराठी- इंग्रजी शब्दसूची

# हज समिति अधिनियम, २००२

## (२००२ चा अधिनियम क्रमांक ३५)

(६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान )

[११ जून, २००२]

**हजसाठी मुसलमानांच्या तीर्थयात्रेची व्यवस्था करण्याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित बाबींकरिता, भारतीय हज समिती व राज्य हज समित्या स्थापन करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय प्रजासत्ताकाच्या त्रेपन्नाव्या वर्षी संसदेकडून तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :---

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, "हज समिती अधिनियम, २००२" असे म्हणावे.

(२) तो केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास व दिनाकांना* अंमलात येईल, आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींसाठी व वेगवेगळया राज्यांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,---

(क) "उपविधि" याचा अर्थ, कलम ४५ अन्वये तयार केलेले उपविधी, असा आहे ;

(ख) "मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा कार्यकारी अधिकारी" याचा अर्थ, कलम १६ च्या पोटकलम (१) अन्वये, किंवा, यथास्थिति, कलम २९ च्या पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा राज्य समितीचा कार्यकारी अधिकारी, असा आहे ;

(ग) "समिती" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेली भारतीय हज समिती, असा आहे ;

(घ) "सदस्य" याचा अर्थ, कलम ४ अन्वये नामनिर्देशित केलेला, भारतीय हज समितीचा, किंवा यथास्थिति, कलम १८ अन्वये नामनिर्देशित केलेला राज्य हज समितीचा सदस्य, असा आहे आणि त्यात, अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा समावेश होतो ;

(ङ) "अधिसूचना" याचा अर्थ, भारताच्या **राजपत्रात** किंवा, यथास्थिति, राज्याच्या **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे ;

(च) "यात्रेकरू" याचा अर्थ, हजला जाणारी, किंवा हजहून परत येणारी मुसलमान व्यक्ती, असा आहे ;

(छ) "विहित" याचा अर्थ, केंद्र सरकारने कलम ४४ अन्वये, किंवा यथास्थिति, राज्य शासनाने कलम ४७ अन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ज) "राज्य समिती" याचा अर्थ, कलम १८ अन्वये घटित केलेली राज्य हज समिती, असा आहे ; आणि यात संयुक्त राज्य समितीचा समावेश होतो ;

(झ) "राज्य शासन" याचा संघ राज्यक्षेत्राच्या संबंधात अर्थ, संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये राष्ट्रपतींनी नियुक्त केलेला संघ राज्यक्षेत्राचा प्रशासक, असा आहे.

प्रकरण दोन

**भारतीय हज समिती**

**भारतीय हज समिती घटित करणे व तिचे विधिसंस्थापन करणे.**

३. (१) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबत नियत करील अशा दिनांकापासून, भारतीय हज समिती या नावाची एक समिती घटित करील.

(२) ही समिती, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, जंगम व स्थावर मालमत्ता संपादन करण्याच्या, धारण करण्याच्या व तिची विल्हेवाट लावण्याच्या, धर्मादाय न्यास किंवा दाननिधी निर्माण करण्याच्या आणि संविदा करण्याच्या अधिकारांसह उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असलेला उपरोक्त नावाचा एक निगम-निकाय असेल आणि उक्त नावाने ती दावा लावील व तिच्यावर दावा लावला जाईल.

(३) समितीचे स्वत:चे मुख्यालय मुंबई येथे असेल आणि जेव्हा केव्हा समितीला तिच्या कार्याच्या दृष्टीने आवश्यक वाटेल तेव्हा, केंद्र सरकारशी विचारविनिमय करून, जादा प्रादेशिक कार्यालये सुरू करता येतील.

समितीची रचना. ४. समिती, पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(एक) लोकसभेच्या अध्यक्षाने लोकसभेच्या मुसलमान सदस्यांमधून नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य आणि राज्यसभेच्या मुसलमान सदस्यांमधून नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य असे मिळून संसदेचे तीन सदस्य :

परंतु, एखादा संसद सदस्य, सदस्य असण्याचे बंद झाल्यावर, तो समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल आणि लोकसभेचा अध्यक्ष, किंवा, यथास्थिति, राज्यसभेचा सभापती, केंद्र सरकारने विनंती केल्यावर, नव्याने नामनिर्देशन करील ;

(दोन) समितीच्या नऊ मुसलमान सदस्यांपैकी, मागील तीन वर्षांमध्ये सर्वात जास्त संख्येने यात्रेकरू पाठविणाऱ्या राज्यांमधून तीन सदस्य, आणि अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांमधून प्रत्येकी एक सदस्य, याप्रमाणे, विहित करण्यात येईल अशी रीतीने निवडण्यात येतील :

परंतु, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये येणाऱ्या राज्यातून एकापेक्षा अधिक सदस्य निवडण्यात येणार नाहीत ;

(तीन) परराष्ट्रीय व्यवहार, गृह, वित्त व नागरी विमानचालन या मंत्रालयांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी शासनाने नामनिर्देशित केलेल्या, भारत सरकारच्या सहसचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या चार व्यक्ती, *पदसिद्ध* सदस्य असतील ;

(चार) सात मुसलमान सदस्य, पुढील व्यक्तींच्या प्रवर्गातून केंद्र सरकारकडून नामनिर्देशित करण्यात येतील :—

(क) लोकप्रशासन, वित्त, शिक्षण, सांस्कृतिक व सामाजिक कार्य यांमधील विशेष ज्ञान असलेले दोन सदस्य आणि त्यांपैकी एक सदस्य शिया मुसलमान असेल ;

(ख) दोन महिला सदस्य, त्यांपैकी एक सदस्य शिया मुसलमान असेल ;

(ग) मुस्लिम धर्मशास्त्र व कायदा यांमधील विशेष ज्ञान असलेले तीन सदस्य, त्यांपैकी एक सदस्य शिया मुसलमान असेल.

सदस्यांची अधिसूचना. ५. कलम ४ अन्वये, समितीच्या सदस्यांच्या नामनिर्देशनानंतर, शक्य तितक्या लवकर, केंद्र सरकार, समितीच्या अशा सर्व सदस्यांची नावे **राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करील.

पदावधी. ६. (१) समितीच्या सदस्यांचा पदावधी (पदसिद्ध सदस्य व नैमित्तिक रिक्त झालेल्या पदांवर भरती करण्यात आलेले सदस्य वगळून) कलम ५ अन्वये सदस्यांची यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच्या दिवसापासून तीन वर्षे इतका असेल :

परंतु, केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, समितीच्या सदस्यांचा पदावधी, एकावेळी सहा महिन्यांहून अधिक नाही, परंतु कोणत्याही बाबतीत, एकूण एका वर्षाहून अधिक होणार नाही एवढ्या कालावधीसाठी वाढवता येईल.

(२) अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले भत्ते व त्यांच्या इतर अटी व शर्ती, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

अध्यक्ष व उपाध्यक्ष. ७. (१) कलम ५ अन्वये समितीच्या सदस्यांची नावे प्रसिद्ध केल्यानंतर, केंद्र सरकार, अशी नावे प्रसिद्ध केल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, समितीची पहिली सभा बोलावील आणि समिती, या पहिल्या सभेत तिच्या सदस्यांमधून एक अध्यक्ष व दोन उपाध्यक्ष निवडील :

परंतु, एखादा मंत्री समितीचा अध्यक्ष असणार नाही आणि *पदसिद्ध* सदस्य हा, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीमध्ये भाग घेणार नाही.

(२) जर समिती, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांची निवड करण्यास निष्फळ ठरल्यास, केंद्र सरकार, समितीच्या सदस्यांस, तिचा अध्यक्ष, तिचा यथास्थिति, उपाध्यक्ष म्हणून नियुक्त करू शकेल.

(३) अध्यक्ष, विहित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.

(४) उपाध्यक्ष, समितीने याबाबतीत केलेल्या उपविधीद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील :

परंतु, असे उपविधी तयार करण्यात येईपर्यंत, उपाध्यक्ष, यासंबंधात अध्यक्षाने दिलेल्या आदेशाद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

(५) अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड, केंद्र सरकारद्वारे, **राजपत्रामध्ये** अधिसूचित करण्यात येईल.

(६) अध्यक्ष व यथास्थिति, उपाध्यक्ष यांचा पदावधी समितीच्या पदावधीबरोबरच समाप्त होईल आणि कोणतीही व्यक्ती, लागोपाठ दोनपेक्षा अधिक पदावधींसाठी अध्यक्षांचे किंवा, यथास्थिति, उपाध्यक्षाचे पद धारण करणार नाही.

(७) अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे नैमित्तिक रिक्त होणारे कोणतेही पद, उर्वरित पदावधीसाठी पोटकलम (१) किंवा यथास्थिति, पोटकलम (२) अनुसार, भरण्यात येईल.

**समिती पुनर्घटित करणे.**

**८.** (१) केंद्र सरकार, समितीचा पदावधी, किंवा, यथास्थिति, वाढीव पदावधी समाप्त होण्यापूर्वी किमान चार महिने अगोदर नवीन समिती पुनर्घटित करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करील किंवा उपाययोजना करण्याची व्यवस्था करील.

(२) एखादा मावळता सदस्य, दोनपेक्षा अधिक नसेल अशा पदावधीसाठी समितीवर पुनर्नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असेल :

परंतु, पन्नास टक्क्यापेक्षा अधिक नसतील इतके सदस्य, विहित करण्यात येईल अशा रीतीने, दुसऱ्या पदावधीसाठी, पुनर्नामनिर्देशित करता येतील.

**समितीची कर्तव्ये.**

**९.** (१) समितीची कर्तव्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(एक) यात्रेकरूंसाठी उपयुक्त असलेली माहिती गोळा करणे व ती प्रसारित करणे, आणि यात्रेकरूंसाठी दिशानिदेशन व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे ;

(दोन) तीर्थयात्रेस जातेवेळी किंवा तीर्थयात्रेवरून परत येतेवेळी, यात्रेकरूंना, भारतातील यात्रा-प्रारंभाच्या ठिकाणी त्यांनी केलेल्या मुक्कामाच्या कालावधीत, लसीकरण, लस टोचणे, वैद्यकीय तपासणी, यात्रेकरूंचे पास देणे व परकीय चलन यांसह सर्व बाबतीत सल्ला देणे व सहाय्य करणे आणि याबाबतीत संबंधित स्थानिक प्राधिकरणांशी संपर्क साधणे ;

(तीन) आपत्तीच्या काळात यात्रेकरूंना सहाय्य करणे ;

(चार) विमानाने किंवा अन्य कोणत्याही साधानाने प्रवासाची व्यवस्था करण्यासहित वार्षिक हज योजना केंद्र सरकारच्या मान्यतेने निश्चित करणे व सदर योजना अंमलात आणणे आणि निवासव्यवस्थेच्या संबंधातील सर्व बाबींवर सल्ला देणे ;

(पाच) समितीच्या अर्थसंकल्पीय अंदाजांना मंजुरी देणे आणि केंद्र सरकारच्या संमतीसाठी ते, वित्तीय वर्षाची सुरुवात होण्यापूर्वी किमान तीन महिने अगोदर केंद्र सरकारला सादर करणे ;

(सहा) यात्रेकरूंसाठी प्रवासाच्या सुविधांची सुनिश्चिती करण्याच्या प्रयोजनासाठी, केंद्र सरकार, रेल्वे सेवा, विमान सेवा व प्रवासी संस्था यांच्यांशी समन्वय साधणे ;

(सात) एकंदरीत यात्रेकरूंच्या कल्याणाची काळजी घेणे ;

(आठ) समितीने याबाबतीत तयार केलेल्या उपविधीद्वारे निश्चित करण्यात येतील अशी, समितीची कार्यवृत्ते आणि यात्रेकरूंच्या हिताच्या असतील अशा बाबी प्रसिद्ध करणे ;

(नऊ) केंद्र सरकारद्वारे विहित करण्यात येतील अशी, हजच्या संबंधातील इतर कर्तव्ये पार पाडणे.

(२) केंद्र सरकार, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये पार पाडताना, समितीला सर्वतोपरी सहाय्य करील.

**समितीच्या सभा.**

**१०.** (१) समिती, हज योजना तयार करण्याकरिता व हज व्यवस्था करण्याकरिता, हजचा कार्यकाल सुरू होण्यापूर्वी वर्षातून किमान तीन वेळा आणि समितीने केलेल्या सर्व व्यवस्थांचा आढावा घेण्याकरिता त्यानंतर एकदा सभा घेईल.

(२) समितीच्या किमान एक तृतीयांश सदस्यांकडून मागणी करण्यात येईल तेव्हा व त्यानुसार किंवा अध्यक्षास आवश्यक वाटेल तेव्हा, समिती पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सभांच्या व्यतिरिक्त आणखी सभा घेईल.

(३) समितीच्या कोणत्याही सभेची गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक सदस्य-संख्या, समितीच्या सदस्यांपैकी एक तृतीयांश सदस्य इतकी असेल.

(४) सर्व बाबींवर, उपस्थित असलेल्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास अशा प्रसंगी, अध्यक्षास किंवा अन्य अध्यक्षपदीय व्यक्तीस निर्णायक मत असेल.

(५) समिती, आपल्या सभांमधील कामकाज पार पाडण्याच्या संबंधात उपविधींद्वारे निश्चित करण्यात येईल अशा कार्यपद्धतीच्या नियमांचे पालन करील.

**स्थायी समित्या व उपसमित्या नियुक्त करणे.**

**११.** (१) समिती, वित्तव्यवस्थेच्या व हज व्यवस्थेच्या संबंधातील बाबी हाताळण्यासाठी, आपल्या सदस्यांमधून दोन स्थायी समित्या नियुक्त करील आणि समितीने याबाबतीत तयार केलेल्या उपविधींद्वारे निश्चित करण्यात येतील. इतक्या सदस्यसंख्येने मिळून त्या बनलेल्या असतील आणि त्यांना तसे अधिकार व कर्तव्ये असतील आणि समितीचा उपाध्यक्ष हा, प्रत्येक स्थायी समितीच्या प्रमुखपदी असेल :

परंतु, समितीचा अध्यक्ष जर सभेस उपस्थित असेल तर, तो स्थायी समितीच्या सभेचा अध्यक्ष म्हणून काम पाहील.

(२) समिती, तिला योग्य वाटेल अशा प्रयोजनांसाठी, अन्य उपसमित्यादेखील स्थापन करू शकेल आणि अशी कोणतीही उपसमिती, समितीने याबाबतीत, तयार केलेल्या उपविधींद्वारे निश्चित करण्यात येतील अशा सदस्यसंख्येची व अन्य व्यक्तींची मिळून बनलेली असेल.

**समिताचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्याबाबतची किंवा सदस्य असण्याचे चालू राहण्याबाबतची अपात्रता.**

**१२.** जर एखादी व्यक्ती,—

(एक) भारताची नागरिक नसेल ;

(दोन) कलम ४ च्या खंड (तीन) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पदसिद्ध सदस्यांचा अपवाद करता, मुसलमान नसेल ;

(तीन) पंचवीस वर्षांपेक्षा कमी वयाची असेल ;

(चार) विकल मनाची असेल व एखाद्या सक्षम न्यायालयाने तिला तशी असल्याचे घोषित केले असेल ;

(पाच) अमुक्त नादार असेल ;

(सहा) केंद्र सरकारच्या मते, तिने नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणारा एखादा अपराध केलेला असेल ;

(सात) तिला यापूर्वी,—

(क) सदस्य म्हणून तिच्या पदावरून काढून टाकण्यात आले असेल ; किंवा

(ख) एकतर यात्रेकरूंच्या हिताची कृती न केल्यामुळे किंवा भ्रष्टाचार केल्यामुळे एखाद्या सक्षम प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे तिला काढून टाकण्यात आले असेल तर,

ती व्यक्ती, समितीची सदस्य म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास किंवा सदस्य असण्याचे चालू राहण्यास अनर्ह ठरेल.

**अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांचा राजीनामा.**

**१३.** अध्यक्षास, उपाध्यक्षास किंवा अन्य कोणत्याही सदस्यास, केंद्र सरकारला उद्देशून स्वत:च्या सहीने आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल आणि असा राजीनामा, तो दिल्याच्या तारखेपासून परिणामक होईल.

**अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांना पदावरून काढून टाकणे.**

**१४.** (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे समितीच्या अध्यक्षास, उपाध्यक्षास किंवा तिच्या कोणत्याही सदस्यास, जर तो,-------

(एक) कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपात्रतेपैकी कोणत्याही प्रकारे अपात्र असेल किंवा अपात्र ठरत असेल तर ; किंवा

(दोन) कृती करण्यास नकार देत असेल किंवा कृती करण्यास असमर्थ असेल किंवा समितीच्या हितास किंवा यात्रेकरूंच्या हितास जी रीत बाधक आहे असे केंद्र सरकारला, त्याने दिलेले असे कोणतेही स्पष्टीकरण ऐकल्यानंतरदेखील वाटत असेल, अशा रीतीने कृती करीत असेल तर ; किंवा

(तीन) समितीच्या मते कोणत्याही पुरेशा कारणांशिवाय, समितीच्या सलग तीन सभांना उपस्थित राहण्यात त्याने कसूर केली असेल तर,

त्याच्या पदावरून काढून टाकता येईल.

(२) समितीच्या अध्यक्षास किंवा उपाध्यक्षांस पोटकलम (१) अन्वये जेव्हा पदावरून काढून टाकण्यात आले असेल तेव्हा, तो समितीचा सदस्य असण्याचे देखील बंद होईल.

**१५.** (१) जेव्हा सदस्यास काढून टाकल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याचा मृत्यू झाल्यामुळे किंवा अन्य प्रकारे एखाद्या सदस्याची जागा रिक्त होईल तेव्हा, त्याच्या जागेवर नवीन सदस्यास नामनिर्देशित करण्यात येईल किंवा, यथास्थिति, निवडण्यात येईल आणि असा सदस्य, ज्याच्या जागेवर त्याची भरती करण्यात आली आहे असा सदस्य, जर अशी जागा रिक्त झाली नसती तर, जोपर्यंत पद धारण करण्यासाठी हक्कदार ठरला असता तोपर्यंत, ते पद धारण करील. **नैमित्तिक रिक्त जागा भरणे.**

(२) भूतपूर्व सदस्य ज्या प्रवर्गातील होता त्याच प्रवर्गातून पोटकलम (१) खालील कोणतीही रिक्त जागा भरण्यात येईल.

**१६.** (१) केंद्र सरकार, भारत सरकारच्या उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या, केंद्र सरकारच्या व राज्य शासनांच्या मुसलमान अधिकाऱ्यांच्या नामिकेतील एखाद्या व्यक्तीची, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर, समितीचा मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करील. **मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर कर्मचारी.**

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी हा, समितीचा *पदसिद्ध* सचिव असेल.

(३) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, तीन वर्षे इतक्या कालावधीसाठी नियुक्त करण्यात येईल. सदर कालावधी केंद्र सरकारकडून जास्तीत जास्त एक वर्षाच्या कालावधीसाठी वाढविला जाईल.

(४) मुख्य कार्यकारी अधिकारी, समितीच्या निर्णयांची अंमलबजावणी करील आणि विहित करण्यात येतील अशी अन्य कार्ये पार पाडील :

परंतु मुख्य कार्यकारी अधिकारी व समिती यांच्यामध्ये कोणताही मतभेद झाल्यास, तो, सदर बाब केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून देईल व त्यावरील केंद्र सरकारचा निर्णय अंतिम असेल.

(५) समिती, या अधिनियमाची प्रयोजने, पार पाडण्यासाठी, केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीने, तिला आवश्यक वाटतील अशा अन्य अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर, नियुक्ती करू शकेल.

## प्रकरण तीन
## राज्य हज समित्या

**१७.** (१) केंद्र सरकार **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, याबाबतीत नियत करील अशा तारखेपासून, राज्य शासन ................ (राज्याचे नाव) हज समिती या नावाची एक समिती घटित करील : **राज्य हज समिती घटित करणे व तिचे विधिसंस्थापन करणे.**

परंतु, एखाद्या राज्यासाठी किंवा संघराज्यक्षेत्रासाठी हज समिती स्थापन करणे आवश्यक नाही, असे कोणत्याही कारणांमुळे केंद्र सरकारला दिसून आल्यास, केंद्र सरकार, एखाद्या शेंजारच्या राज्य हज समितीस, त्या राज्याच्या व संघराज्यक्षेत्राच्या यात्रेकरूंची व्यवस्था प्राधिकृत करू शकेल आणि अशा समितीत त्यांचे योग्य ते प्रतिनिधित्व करण्याची सूचना करू शकेल.

(२) ही राज्य समिती, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, जंगम व स्थावर मालमत्ता संपादन करण्याच्या, धारण करण्याच्या व विल्हेवाट लावण्याच्या, धर्मादाय न्यास किंवा दाननिधी निर्माण करण्याच्या आणि संविदा करण्याच्या अधिकारांसह उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असलेला, उपरोक्त नावाचा एक निगम-निकाय असेल आणि उक्त नावाने तिला किंवा तिच्यावर दावा दाखल करता येईल.

(३) या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी,——

(क) शेजारच्या दोन किंवा अधिक राज्यांच्या शासनांमध्ये, किंवा

(ख) केंद्र सरकार (एक किंवा अधिक संघ राज्यक्षेत्रांच्या बाबतीत) आणि अशा संघ राज्यक्षेत्राच्या किंवा संघ राज्यक्षेत्रांच्या शेजारी असलेली एक किंवा अधिक राज्य शासने यांच्यामध्ये,——

(एक) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणी सहभागी होणाऱ्या सर्व राज्यांसाठी आणि

(दोन) खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणी सहभागी होणाऱ्या संघ राज्यक्षेत्रासाठी किंवा संघ राज्यक्षेत्रांसाठी आणि राज्यासाठी किंवा राज्यांसाठी,

एखादी संयुक्त राज्य समिती स्थापन करण्याची तरतूद करण्यासाठी करार करता येईल, आणि करारामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी आणि कोणत्याही वाढीव कालावधीसाठी, जर कोणता असल्यास, त्याचे नवीकरण करण्याच्या तरतुदीस अधीन राहून तो अंमलात राहील.

(४) या कलमान्वये केलेला करार, पोटकलम (२) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणी, सहभागी होणाऱ्या राज्याच्या **राजपत्रामध्ये** आणि त्या पोटकलमाच्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकरणी, सहभागी होणाऱ्या संघ राज्यक्षेत्रांच्या किंवा संघ राज्यक्षेत्रांच्या आणि सहभागी होणाऱ्या राज्याच्या किंवा राज्यांच्या **राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करण्यात येईल.

(५) या अधिनियमात राज्य समितीच्या संबंधात कोणत्याही निर्देशाचा अर्थ, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, संयुक्त राज्य समितीचा त्यात अंतर्भाव असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

राज्य समितीची रचना.

**१८.** (१) राज्य समिती, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाच्या पुढील सोळा सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(एक) (क) राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संसदेच्या ;

(ख) राज्य विधानसभेच्या ; आणि

(ग) जर अस्तित्वात असेल तर, विधानपरिषदेच्या ;

मुसलमान सदस्यांपैकी तीन सदस्य ;

(दोन) राज्यातील स्थानिक संस्थांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मुसलमान सदस्यांपैकी तीन सदस्य ;

(तीन) मुस्लिम धर्मशास्त्र व कायदा यामधील तज्ज्ञ असणारे तीन सदस्य, त्यापैकी एक सदस्य, शिया मुसलमान असेल ;

(चार) लोकप्रशासन, वित्त, शिक्षण, सांस्कृतिक व सामाजिक कार्य या क्षेत्रांमध्ये कार्य करणाऱ्या मुस्लिम स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधित्व करणारे पाच सदस्य ;

(पाच) राज्य वक्फ मंडळाचा अध्यक्ष ; आणि

(सहा) राज्य समितीचा कार्यकारी अधिकारी, जो राज्य समितीचा *पदसिद्ध* सदस्य असेल :

परंतु, कोणत्याही संघराज्यक्षेत्राची समिती किंवा संयुक्त राज्य समिती, विहित करण्यात येईल इतक्या सदस्यांची मिळून बनलेली असेल.

(२) जेथे, पोटकलम (१) च्या खंड (एक) व (दोन) मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गांपैकी कोणत्याही प्रवर्गामध्ये मुसलमान सदस्य नसेल किंवा राज्यामध्ये विधानपरिषद अस्तित्वात नसेल अशा बाबतीत, विहित करण्यात येईल अशा रीतीने नामनिर्देशन करण्यात येईल.

सदस्यांची अधिसूचना.

**१९.** कलम १८ च्या पोटकलम (१) अन्वये, राज्य समितीच्या सदस्यांचे नामनिर्देशन केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य शासन, समितीच्या अशा सर्व सदस्यांची नावे, राज्याच्या **राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करील.

पदावधी.

**२०.** (१) राज्य समितीच्या सदस्याचा पदावधी (पदसिद्ध सदस्य व नैमित्तिक रिक्त झालेल्या जागेवर भरती केलेले सदस्य वगळून), कलम १९ अन्वये सदस्यांची यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच्या दिवसापासून तीन वर्षे इतका असेल.

(२) अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले भत्ते व त्यांच्या इतर अटी व शर्ती विहित करण्यात येतील त्याचप्रमाणे असतील.

अध्यक्ष.

**२१.** (१) कलम १९ अन्वये राज्य समितीच्या सदस्यांची नावे प्रसिद्ध केल्यानंतर, राज्य शासन अशी नावे प्रसिद्ध केल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, राज्य समितीची पहिली सभा बोलावील आणि राज्य समिती या पहिल्या सभेत तिच्या सदस्यांमधून एक अध्यक्ष निवडील :

परंतु *पदसिद्ध* सदस्य अध्यक्षाच्या निवडणुकीत सहभागी होणार नाही.

(२) जर राज्य समिती अध्यक्षाची निवड करण्यास निष्फळ ठरली तर, राज्य शासन, राज्य समितीच्या सदस्यास, तिचा अध्यक्ष म्हणून नियुक्त करू शकेल.

(३) अध्यक्षाची निवड, राज्य शासनाकडून राज्याच्या **राजपत्रामध्ये** अधिसूचित करण्यात येईल.

(४) अध्यक्षाचा पदावधी तीन वर्षे इतका असेल आणि कोणतीही व्यक्ती लागोपाठच्या दोनपेक्षा अधिक पदावधीसाठी अध्यक्षाचे पद धारण करणार नाही.

(५) अध्यक्षाचे नैमित्तिक रिक्त होणारे कोणतेही पद, पोटकलम (१), किंवा यथास्थिति, पोटकलम (२) अनुसार भरण्यात येईल.

२२. (१) राज्य शासन, राज्य समितीच्या पदावधी समाप्त होण्यापूर्वी किमान चार महिने अगोदर नवीन राज्य समिती पुनर्घटित करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करील किंवा करण्याची व्यवस्था करील. राज्य समिती पुनर्घटित करणे.

(२) एखादा मावळता सदस्य, दोनपेक्षा अधिक नसेल इतक्या पदावधींसाठी राज्य समितीवर पुनर्नामनिर्देशित केला जाण्यास पात्र असेल:

परंतु, नामनिर्देशित व्यक्तींपैकी पन्नास टक्के व्यक्तींना, विहित करण्यात येईल अशा रीतीने, दुसऱ्या पदावधीसाठी पुनर्नामनिर्देशित करता येईल.

२३. जर एखादी व्यक्ती,— समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यास किंवा सदस्य असण्याचे चालू राहण्यास अपात्रता.

(एक) भारताची नागरिक नसेल ;

(दोन) त्या राज्याची रहिवासी नसेल ;

(तीन) कलम १८ च्या पोटकलम (१) च्या खंड (सहा) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कार्यकारी अधिकाऱ्याचा अपवाद करता, मुसलमान नसेल ;

(चार) पंचवीस वर्षांपेक्षा कमी वयाची असेल ;

(पाच) विकल मनाची असेल व एखाद्या न्यायालयाने तिला तशी असल्याचे घोषित केले असेल ;

(सहा) अमुक्त नादार असेल ;

(सात) राज्य शासनाच्या मते तिने नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणारा एखादा अपराध केलेला असेल ;

(आठ) तिला यापूर्वी ;

(क) सदस्य म्हणून तिच्या पदावरून काढून टाकण्यात आले असेल; किंवा

(ख) एकतर यात्रेकरूंच्या हिताची कृती न केल्यामुळे किंवा भ्रष्टाचार केल्यामुळे एखाद्या सक्षम प्राधिकरणाच्या आदेशाद्वारे काढून टाकण्यात आले असेल तर,

ती व्यक्ती, राज्य समितीचा सदस्य म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास अनर्ह ठरेल.

२४. अध्यक्षास किंवा अन्य कोणत्याही सदस्यास राज्य शासनाला उद्देशून स्वत:च्या सहीने आपल्या पदाचा लेखी राजीनामा देता येईल आणि असा राजीनामा, तो दिल्याच्या तारखेपासून परिणामक होईल. अध्यक्ष व सदस्य यांचा राजीनामा.

२५. (१) राज्य समितीचा अध्यक्ष किंवा तिचा कोणताही सदस्य जर,— अध्यक्ष व सदस्य यांना पदावरून काढून टाकणे.

(एक) कलम २३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणामुळे अनर्ह असेल किंवा अनर्ह ठरत असेल तर ; किंवा

(दोन) कृती करण्यास नकार देत असेल किंवा कृती करण्यास असमर्थ असेल किंवा राज्य समितीच्या हितास किंवा यात्रेकरूंच्या हितास बाधक आहे असे राज्य शासनाला त्याने दिलेले कोणतेही स्पष्टीकरण ऐकल्यानंतरदेखील वाटत असेल, अशा रीतीने कृती करील असेल तर ; किंवा

(तीन) राज्य समितीच्या मते कोणत्याही पुरेशा कारणांशिवाय राज्य समितीच्या सलग तीन सभांना उपस्थित राहण्यात त्याने कसूर केली असेल तर,

राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्यास पदावरून काढून टाकता येईल.

(२) राज्य समितीच्या अध्यक्षास, पोटकलम (१) अन्वये पदावरून काढून टाकण्यात आले असेल तेव्हा तो राज्य समितीचा सदस्य असण्याचे देखील बंद होईल.

२६. (१) जेव्हा सदस्यास काढून टाकल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्यामुळे किंवा अन्य प्रकारे एखाद्या सदस्याची जागा रिक्त होईल तेव्हा, त्याच्या जागेवर नवीन सदस्यास, नामनिर्देशित करण्यात येईल आणि असा सदस्य, त्याच्या जागेवर त्याला भरती करण्यात आले आहे असा सदस्य, जर अशी जागा रिक्त झाली नसती तर, जोपर्यंत पद धारण करण्यासाठी हक्कदार ठरला असता, तोपर्यंत पद धारण करील. नैमित्तिक रिक्त जागा भरणे.

(२) भूतपूर्व सदस्य ज्या प्रवर्गातील होता त्याच प्रवर्गातून पोटकलम (१) अन्वये कोणतीही रिक्त जागा भरण्यात येईल.

२७. (१) हज यात्रेकरूंच्या हितासाठी समितीच्या धोरणांची व निदेशांची अंमलबजावणी करणे हे राज्य समितीचे कर्तव्य असेल. राज्य समितीची कर्तव्ये.

(२) राज्य समिती, हज यात्रेकरूंना, त्यांचे मूळ राज्य व भारतातून यात्रेस प्रारंभ करण्याचे ठिकाण या दरम्यान, त्यांची वाहतूक आणि यात्रेस प्रारंभ करण्याच्या ठिकाणी त्यांची तात्पुरती निवासव्यवस्था या बाबींसह सहाय्य करील.

(३) राज्य समिती, हजच्या संबंधात, संबंधित राज्य शासन, केंद्र सरकारशी विचारविनिमय करून विहित करील अशी, इतर कर्तव्ये पार पाडील.

**राज्य समितीची सभा.**

**२८.** (१) राज्य समिती, हजचा यात्राकाल सुरू होण्यापूर्वी एकदा आणि त्यानंतर हज यात्राकाल संपल्यावर एकदा, अशी वर्षातून किमान दोन वेळा सभा घेईल.

(२) समितीच्या कोणत्याही सभेची गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असलेली सदस्य संख्या, समितीच्या सदस्यांपैकी एक तृतीयांश सदस्य इतकी असेल.

(३) समितीच्या किमान एक-तृतीयांश सदस्यांकडून मागणी करण्यात येईल तेव्हा व त्यांनुसार किंवा अध्यक्षाला आवश्यक वाटेल तेव्हा, राज्य समिती, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सभांव्यतिरिक्त आणखी सभा घेईल.

(४) सर्व बाबींवर, उपस्थित असलेल्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास, अशा प्रसंगी, अध्यक्षास किंवा अन्य अध्यक्षपदीय व्यक्तीस निर्णायक मत असेल.

**राज्य समितीचे कार्यकारी अधिकारी व इतर कर्मचारी.**

**२९.** (१) राज्य शासन, उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या आपल्या अधिकाऱ्यांमधून एका व्यक्तीची राज्य समितीचा कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करील :

परंतु, अशा प्रकारे नियुक्त करण्यात येणारी व्यक्ती, विशेषतः मुसलमान असेल.

(२) राज्य समितीचा कार्यकारी अधिकारी हा, समितीचा सचिव म्हणून कार्य करील.

(३) कार्यकारी अधिकारी राज्य समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करील आणि विहित करण्यात येतील अशी अन्य कार्ये पार पाडील :

परंतु, कार्यकारी अधिकारी व राज्य समिती यांच्यामध्ये कोणताही मतभेद झाल्यास, तो सदर बाब राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देईल व त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(४) राज्य समिती, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, तिला आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने नियुक्ती करील.

(५) अधिकारी व इतर कर्मचारी यांचा पदावधी व त्यांच्या सेवेच्या शर्ती विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण चार
## वित्तव्यवस्था, लेखा आणि लेखापरीक्षा

**केंद्रीय हज निधी.**

**३०.** समितीच्या स्वतःच्या मालकीचा केंद्रीय हज निधी या नावाचा एक निधी असेल आणि त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :——

(क) समितीकडून,-----

(एक) हजच्या अर्जाच्या नोंदणीसाठी ; आणि

(दोन) हज यात्रेकरूंना प्रवासाचा परवाना देण्यासाठी,

आकारण्यात येईल अशी फी आणि सेवा आकार यांपासून झालेल्या रकमा ;

(ख) हज यात्रा पूर्ण करण्यासाठी यात्रेकरूकडून गोळा केलेला पैसा ;

(ग) समितीच्या निधीच्या सर्व ठेवी व गुंतवणूक यांपासून मिळालेले उत्पन्न ;

(घ) मृत हज यात्रेकरूंच्या चीजवस्तुंची विक्री करून प्राप्त झालेल्या व हज यात्रेकरूंच्या मागे राहिलेल्या आणि त्यांच्या मृत्यूनंतर कोणीही दावा न सांगितलेल्या व केंद्र सरकारकडे व्यपगत झालेल्या रकमा ;

(ङ) केंद्र सरकार व राज्य शासन यांनी कर्जाऊ दिलेल्या किंवा शासनाने मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही मार्गाने मिळालेल्या कोणत्याही रकमा ;

(च) समितीला अन्य कोणत्याही मार्गाने कायदेशीररीत्या येणे असलेली कोणतीही रक्कम ; आणि

(छ) हज समिती अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५१) अन्वये स्थापन झालेल्या हज निधीमध्ये किंवा गरीब यात्रेकरू निधीमध्ये या अधिनियमाच्या प्रारंभापासून जमा असलेली रक्कम.

**३१.** या अधिनियमाच्या व त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, केंद्रीय हज निधी समितीच्या नियंत्रणाखाली व व्यवस्थापनाखाली असेल आणि तो पुढील प्रयोजनांसाठी वापरण्यात येईल :— **केंद्रीय हज निधीचे उपयोजन.**

(क) समितीचे कार्यकारी अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वेतन व भत्ते ;

(ख) कलम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेली उद्दिष्टे पार पाडण्यासंबंधातील आनुषंगिक आकार व खर्च प्रदान करणे ; आणि

(ग) केंद्र सरकारच्या मान्यतेने, समितीने किंवा राज्य समितीने भागविणे आवश्यक असलेला अन्य कोणताही खर्च.

**३२.** राज्य समितीचा स्वत:चा मालकीचा राज्य हज निधी या नावाचा एक निधी असेल, त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :— **राज्य हज निधी.**

(एक) या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समितीने दिलेल्या सर्व रकमा किंवा दिलेली कोणतीही अनुदाने ;

(दोन) राज्य शासनाने मान्यता दिल्याप्रमाणे या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, राज्य समितीला राज्य शासनाकडून किंवा अन्य कोणत्याही मार्गाने मिळालेले कोणतेही अनुदान किंवा कर्ज ;

(तीन) राज्य समितीला, कोणत्याही मार्गाने कायदेशीररीत्या येणे असलेली कोणतीही रक्कम ; आणि

(चार) या अधिनियमाच्या प्रारंभास राज्य हज समितीकडे कोणताही असल्यास, जमा असलेला कोणताही पैसा.

**३३.** या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, राज्य हज निधी राज्य समितीच्या नियंत्रणाखाली व व्यवस्थापनाखाली असेल आणि तो पुढील प्रयोजनासांठी वापरण्यात येईल :— **राज्य हज निधीचे उपयोजन.**

(एक) राज्य समितीच्या कार्यकारी अधिकाऱ्यांव्यतिरिक्त तिच्या अन्य कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते देणे कार्यकारी अधिकाऱ्याचे वेतन व भत्ते यांचा खर्च राज्य शासनाकडून करण्यात येईल ;

(दोन) कलम २७ मध्ये विनिर्दिष्ट केलेली उद्दिष्टे पार पाडण्यासाठी, राज्य समितीने आपल्या कर्तव्यांचे योग्यरीत्या पालन करण्यासंबंधातील आनुषंगिक आकार आणि खर्च प्रदान करणे ; आणि

(तीन) राज्य शासनाच्या मान्यतेने राज्य समितीकडून भागवला जाणे आवश्यक असलेला इतर कोणताही खर्च.

**३४.** (१) समिती आणि प्रत्येक राज्य समिती, केंद्र सरकारकडून, किंवा, यथास्थिती, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात योग्य लेखे व इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि वार्षिक लेखा विवरणपत्र तयार करील. **लेखा आणि लेखापरीक्षा.**

(२) केंद्र सरकार किंवा, यथास्थिति, राज्य शासन मान्यता देईल अशा लेखापरीक्षकांकडून दरवर्षी लेख्यांची तपासणी व लेखापरीक्षा केली जाईल.

(३) लेखापरीक्षकांकडून प्रमाणित करण्यात आलेले समितीचे किंवा राज्य समितीचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षा अहवालासह दरवर्षी उक्त समित्यांकडून केंद्र सरकारकडे किंवा, यथास्थिति, राज्य शासनाकडे पाठवण्यात येतील.

(४) केंद्र सरकार, पोटकलम (३) खालील लेखापरीक्षा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, होईल तितक्या लवकर, तो संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

(५) राज्य शासन, पोटकलम (३) खालील लेखापरीक्षा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, होईल तितक्या लवकर, तो राज्य विधानमंडळासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण पाच
## संकीर्ण

**३५.** (१) समितीला, हज यात्रेकरूस, एक खराखुरा यात्रेकरू म्हणून भारतातून सौदी अरेबियात जाण्यासाठी, यात्रेकरू-परवाना या नावाने संबोधला जाणारा प्रवासी दस्तऐवज देण्याचा अधिकार असेल आणि उक्त यात्रेकरूस पारपत्र अधिनियम, १९६७ (१९६७ चा १५) याच्या कलम ३ च्या तरतुदींमधून सूट देण्यात आली असल्याचे समजण्यात येईल. **यात्रेकरू-परवाने देण्याचे व फी आकारण्याचे समितीचे अधिकार.**

(२) पारपत्र अधिनियम, १९६७ (१९६७ चा १५) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, केंद्र सरकार, समितीशी विचारविनिमय करून, हज यात्रेकरूंची नोंदणी करण्यासाठी, समितीने यात्रेकरूंना परवाना देण्यासाठी आणि संबंधित बाबींसाठी अशी सेवा देण्याच्या संबंधित विहित करण्यात येईल अशी फी आकारू शकेल.

समितीचे निष्प्रभावन.

**३६.** (१) केंद्र सरकारच्या मते, जर समिती या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तिच्यावर सोपविलेल्या कर्तव्याचे पालन करण्यास असमर्थ असेल किंवा कर्तव्यपालनात सतत कसूर करीत असेल किंवा ती आपल्या अधिकारांचे उल्लंघन करीत असेल किंवा दुरुपयोग करीत असेल तर, केंद्र सरकार **राजपत्रात** कारणाच्या निवेदनासह प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, सदर आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीसाठी, समितीचे निष्प्रभावन करू शकेल :

परंतु, उपरोक्तप्रमाणे निष्प्रभावनाचा आदेश देण्यापूर्वी, केंद्र सरकार, समितीला, तिचे निष्प्रभावन का करू नये, याबाबतची कारणे दाखवण्याची वाजवी संधी देईल.

(२) जेव्हा पोटकलम (१) अन्वये अशा समितीचे निष्प्रभावन करण्यात येईल तेव्हा,—

(क) सर्व सदस्य, खंड (घ) अन्वये नामनिर्देशित केले जाण्याच्या त्यांच्या पात्रतेस बाध न येता, आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून असे सदस्य म्हणून आपली पदे रिक्त करतील ;

(ख) समितीच्या निष्प्रभावनाच्या कालावधीत, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये, समितीला प्रदान केलेले सर्व अधिकार व तिच्यावर सोपविलेली सर्व कर्तव्ये यांचा, याबाबत केंद्र सरकार नियुक्त करील अशा अधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून वापर करण्यात येईल व ती पार पाडण्यात येतील ;

(ग) समितीकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, समिती पुनर्घटित होईपर्यंत, केंद्र सरकारकडे निहित असेल ;

(घ) निष्प्रभावनाचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी, समिती पुनर्घटित करण्यासाठी केंद्र सरकारकडून नामनिर्देशन करण्यात येईल.

(३) या कलमान्वये दिलेल्या निष्प्रभावनाच्या आदेशासोबत त्याच्या कारणांचे निवेदन, तो आदेश देण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

(४) एखाद्या राज्य शासनाला, या कलमाची पोटकलमे (१), (२) व (३) यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य त्यांमध्ये नमूद केलेल्या शर्तींना आणि याबाबत केंद्र सरकारने दिलेल्या निदेशांना अधीन राहून, राज्य समितीच्या बाबतीत असलेले सर्व अधिकार वापरता येतील व कर्तव्ये पार पाडता येतील.

समितीच्या किंवा राज्य समिताच्या सदस्याचे पद हे लाभाचे पद न ठरणे.

**३७.** त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, समितीच्या किंवा राज्य समितीच्या सदस्याचे पद हे, लाभाचे पद असल्याचे समजण्यात येणार नाही.

पदे रिक्त असणे इत्यादींमुळे समितीची कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

**३८.** समितीची किंवा राज्य समितीची, किंवा, यथास्थिति, संयुक्त समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, समितीमध्ये कोणतेही पद रिक्त आहे किंवा तिच्या घटनेत कोणताही दोष आहे केवळ एवढ्याच कारणास्तव विधिअग्राह्य ठरणार नाही.

समितीचे अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक असणे.

**३९.** समित्यांचे अधिकारी व कर्मचारी आणि या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांन्वये किंवा उपविधींन्वये कोणतेही काम पार पाडण्यासाठी यथोचितरीत्या नियुक्त केलेल्या इतर व्यक्ती या, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानले जाईल.

हानिरक्षण.

**४०.** या अधिनियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल समितीचे किंवा राज्य समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा कोणताही सदस्य यांच्याविरुद्ध केंद्र सरकारच्या, किंवा यथास्थिति, राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

अनुसूचीमध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

**४१.** (१) अनुसूचीत सुधारणा करणे आवश्यक आहे किंवा इष्ट आहे याबाबत केंद्र सरकारची खात्री पटली असेल तर, केंद्र सरकारला **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे अनुसूचीमध्ये सुधारणा करता येईल. आणि त्यानंतर अनुसूचीमध्ये त्यानुसार सुधारणा केली असल्याचे समजण्यात येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या प्रत्येक अधिसूचनेची एक प्रत, ती काढण्यात आल्यावर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

**४२.** हज समितीने किंवा राज्य हज समितीने आपल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य पार पाडल्यामुळे व्यथित झालेला कोणताही हज यात्रेकरू, आपली गाऱ्हाणी दूर करण्यासाठी हज समितीकडे, किंवा, यथास्थिति, राज्य हज समितीकडे अभिवेदन करील आणि उक्त समिती, जर आवश्यक असेल तर, व्यथित झालेल्या व्यक्तींची सुनावणी केल्यानंतर, सदर अभिवेदन निकालात काढील. **गाऱ्हाणी दूर करणे.**

**४३.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून, हज समिती अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५१) अन्वये घटित झालेली हज समिती, मुंबई, हिच्या मालकीची, तिच्या अधिकारातील किंवा नियंत्रणाखालील सर्व मत्ता, हक्क, भाडेपट्टा, अधिकार, प्राधिकार व विशेषाधिकार आणि स्थावर व जंगम मालमत्ता, तसेच जमिनी, इमारती, भांडारे, रोख शिल्लक, हातातील रोकड, राखीव निधी, गुंतवणुका आणि अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी अशा मालमत्तेत असलेले किंवा तिच्यातून उद्भवणारे इतर सर्व हक्क व हितसंबंध आणि लेखापुस्तके, नोंदवह्या आणि त्यांच्याशी संबंधित असलेले कोणत्याही स्वरूपाचे इतर सर्व दस्तऐवज पूर्णपणे समितीकडे निहित होतील आणि समितीच्या मालकीचे असतील. **मालमत्ता व इतर हक्क इत्यादी, समित्यांकडे निहित असणे.**

(२) या अधिनियमाच्या प्रारंभास व तेव्हापासून, एखाद्या राज्याच्या हज समितीच्या मालकीची, अधिकारातील किंवा नियंत्रणाखालील सर्व मत्ता, मालकी हक्क, भाडेपट्टा, अधिकार, प्राधिकार व विशेषाधिकार आणि स्थावर व जंगम मालमत्ता, तसेच जमिनी, इमारती, भांडारे, रोख शिल्लक, हातातील रोकड, राखीव निधी, गुंतवणुका आणि अशा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अशा मालमत्तेत असलेले किंवा त्यापासून उद्भवणारे इतर सर्व मालकी हक्क व हितसंबंध आणि सर्व लेखापुस्तके, नोंदवह्या आणि त्यांच्याशी संबंधित असलेले कोणत्याही स्वरूपाचे सर्व दस्तऐवज पूर्णपणे राज्य हज समितीकडे निहित होतील किंवा अशा राज्य हज समितीच्या मालकीचे होतील.

(३) समितीच्या किंवा राज्य समितीच्या प्रयोजनांसाठी किंवा त्यासंबंधात अशा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, समितीने किंवा राज्य समितीने घेतलेली सर्व कर्जे, त्याबाबतची आबंधने व दायित्वे, तिच्याबरोबर केलेले सर्व करार आणि तिने करण्याचे ठरवलेल्या सर्व बाबी किंवा गोष्टी या, समितीने, किंवा, यथास्थिति, राज्य समितीने घेतलेली कर्जे, त्याबाबतची आबंधने व दायित्वे, तिच्याबरोबर केलेले सर्व करार आणि तिने करण्याचे ठरविलेल्या बाबी किंवा गोष्टी असल्याचे मानण्यात येईल.

(४) अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी, समितीस किंवा राज्य समितीस देय असलेल्या सर्व रकमा, समितीस, किंवा यथास्थिति, राज्य समितीस देय असलेल्या रकमा असल्याचे मानण्यात येईल.

(५) हज़ समिती, मुंबई किंवा राज्य हज समिती यांच्याशी करण्यात आलेली सर्व कंत्राटे आणि त्यांच्या वतीने निष्पादित केलेले सर्व संलेख हे, समितीशी, किंवा यथास्थिति, राज्य समितीशी करण्यात आलेली कंत्राटे किंवा तिच्या वतीने निष्पादित करण्यात आलेले संलेख असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार त्याचे पालन करण्यात येईल.

(६) ज्यात किंवा ज्यांच्या संबंधात हज समिती, मुंबई किंवा राज्य हज समिती पक्षकार आहे असे, या अधिनियमाच्या प्रारंभी प्रलंबित असलेले सर्व दावे व कायदेशीर कार्यवाही यांमध्ये त्यांच्या जागी समिती किंवा, यथास्थिति, राज्य समिती पक्षकार असल्याचे समजण्यात येईल.

**४४.** (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही गोष्टींसाठी तरतूद करता येईल :—

(एक) कलम ४ च्या खंड (दोन) अन्वये समितीच्या सदस्यांची निवड करण्याची रीत ;

(दोन) कलम ६ च्या पोटकलम (२) अन्वये अध्यक्षाच्या व सदस्यांच्या अटी व शर्ती ;

(तीन) कलम ७ च्या पोटकलम (३) अन्वये अध्यक्षाचे अधिकार व कर्तव्ये ;

(चार) कलम ८ च्या पोटकलम (२) च्या परंतुकान्वये ज्या रीतीने सदस्यांना पुनर्नामनिर्देशित करता येईल ती रीत ;

(पाच) कलम ९ च्या पोटकलम (१) च्या खंड (नऊ) अन्वये हजशी संबंधित कर्तव्ये ;

(सहा) कलम १६ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची कार्ये आणि मुख्य कार्यकारी अधिकारी व समितीचे इतर कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(सात) कलम १८ च्या पोटकलम (१) च्या खंड (सहा) च्या परंतुकान्वये संयुक्त राज्य समितीच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या समितीच्या सदस्यांची संख्या ;

(आठ) कलम ३४ अन्वये ज्या रीतीने समितीकडून व राज्य समितीकडून लेखे ठेवण्यात येतील ती रीत आणि अशा लेख्यांचे लेखापरीक्षण ;

(नऊ) कलम ३५ च्या पोटकलम (१) अन्वये हज यात्रेकरू परवाना देणे ;

(दहा) कलम ४१ अन्वये शेजारची लगत राज्ये किंवा संघ राज्यक्षेत्रे मिळून बनणाऱ्या क्षेत्रांशी संबंधित असलेल्या अनुसूचीची सुधारणा ;

(अकरा) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने मिळून बनलेल्या अथवा दोन क्रमवर्ती सत्रांनी मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल, आणि तो ज्या सत्रात ठेवण्यात आला असेल ते सत्र किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या नियमांत कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम, यथास्थिति, केवळ फेरबदल केलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे त्या नियमाखाली तत्पूर्वी करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

उपविधी करण्याचा अधिकार.

**४५.** (१) समितीला, पुढील बाबीसंबंधात, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असतील असे, उपविधी अधिसूचनेद्वारे करता येतील :—

(एक) कलम ७ च्या पोटकलम (४) अन्वये उपाध्यक्षांचे अधिकार व कर्तव्ये ;

(दोन) कलम ९ च्या पोटकलम (१) च्या खंड (आठ) अन्वये, समितीच्या कार्यवृत्ताची आणि यात्रेकरूंच्या हिताच्या कोणत्याही बाबींची प्रसिद्धी करण्यासाठी तरतूद करणे ;

(तीन) कलम १० च्या पोटकलम (५) अन्वये समितीच्या सभेमधील कामकाज पार पाडण्याच्या संबंधातील कार्यपद्धतीचे नियम निर्धारित करणे ;

(चार) कलम ११ अन्वये स्थायी समितीचे अधिकार व कार्ये आणि उप समित्यांमधील सदस्यांची व इतर व्यक्तींची संख्या निश्चित करणे ;

(पाच) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी समितीस आवश्यक वाटेल अशा अन्य कोणत्याही बाबीची तरतूद करणे.

(२) समितीने या कलमान्वये केलेले उपविधी, केंद्र सरकारकडे सादर करण्यात येतील आणि जोपर्यंत केंद्र सरकार त्यास पुष्टी देत नाही तोपर्यंत ते अंमलात येणार नाहीत.

(३) केंद्र सरकारकडून पुष्टी देण्यात आलेले उपविधी, **राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करण्यात येतील.

प्रत्यायोजन करण्याचा अधिकार.

**४६.** या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, समितीस, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने, लेखी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, समितीच्या कोणत्याही सदस्याला किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटी व मर्यादांना अधीन राहून, तिला आवश्यक वाटतील असे, या अधिनियमाखाली असलेले तिचे अधिकार (कलम ४५ खालील उपविधी तयार करण्याच्या अधिकारांखेरीज) प्रत्यायोजित करता येतील.

**४७.** (१) राज्य शासनांना, केंद्र सरकारशी विचारविनिमय करून, या अधिनियमांची राज्य समित्यांच्या संबंधातील प्रयोजने पार पाडण्यासाठी अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.**

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न येता, अशा नियमांत पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही गोष्टींसाठी तरतूद करता येईल :—

(एक) कलम २० च्या पोटकलम (२) अन्वये राज्य समितीच्या अध्यक्षाच्या व सदस्यांच्या अटी व शर्ती ;

(दोन) कलम २२ च्या पोटकलम (२) च्या परंतुकान्वये ज्या रीतीने सदस्यांना पुनर्नामनिर्देशित करता येईल ती रीत ;

(तीन) कलम २७ च्या पोटकलम (३) अन्वये राज्य समितीची कर्तव्ये ;

(चार) कलम २९ च्या अन्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची कार्ये आणि अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(पाच) विहित करणे आवश्यक आहे किंवा विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब ;

(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर मांडण्यात येईल.

**४८.** अस्तित्वात असलेल्या कोणत्याही समितीचा, किंवा, यथास्थिति, राज्य समितीचा प्रत्येक अधिकारी, व अन्य कर्मचारी हा, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून समिती निश्चित करील अशा पदनामासह, समितीकडे, किंवा यथास्थिति, राज्य समितीकडे हस्तांतरित होईल किंवा त्यांचा अधिकारी किंवा कर्मचारी होईल आणि हज समिती अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५१) अन्वये घटित झालेल्या हज समिती तो असता तर, त्याने जे पद धारण केले असते, तेच पद तो तेवढ्याच पदावधीकरिता, त्याच परिश्रमिकावर व सेवेच्या त्याच अटी व शर्तीवर धारण करील किंवा त्यावर सेवा करील आणि अशी समिती, जोपर्यंत अशा सेवेच्या अटी व शर्ती यांमध्ये फेरफार करीत नाही. तोपर्यंत तो समितीचा अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून असे पद धारण करीत राहील : **या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अस्तित्वात असलेल्या समितीच्या कर्मचाऱ्यांबाबत तरतुदी.**

परंतु, समितीच्या, किंवा, यथास्थिति, राज्य समितीच्या अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा किंवा कर्मचाऱ्याचा पदावधी, पारिश्रमिक आणि सेवेच्या अटी व शर्ती यांमध्ये, त्यांना अहितकारी ठरतील अशा प्रकारचे फेरफार, केंद्र सरकारची, किंवा, यथास्थिति, राज्य शासनाची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय करण्यात येणार नाहीत :

परंतु, आणखी असे की, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अशा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा इतर कर्मचाऱ्याने केलेली सेवा ही, या समितीमध्ये किंवा, यथास्थिति, राज्य समितीमध्ये करण्यात आलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल.

**४९.** या अधिनियमाखाली सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा हेतू असलेल्या कोणत्याही कृतीबाबत, शासन किंवा शासनाचा किंवा या अधिनियमान्वये घटित झालेल्या समितीचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करण्यात येणार नाही. **सद्भावनापूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.**

**५०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, केंद्र सरकार, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशा आदेशांद्वारे, ती अडचण करू शकेल : **अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

परंतु, असा कोणताही आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभापासून २ वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर काढण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमान्वये काढलेला कोणताही आदेश, तो काढल्यानंतर, होईल तितक्या लवकर, संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्यात येईल.

**५१.** केंद्र सरकार, या अधिनियमान्वये आपल्या अधिकारांचा वापर करताना व आपली कार्ये पार पाडताना, समितीस किंवा राज्य शासनास किंवा राज्य समितीस लेखी निदेश देऊ शकेल आणि अशी समिती, राज्य शासन किंवा, यथास्थिति, राज्य समिती यांच्यावर अशा निदेशांचे पालन करणे बंधनकारक असेल. **निदेश देण्याचा अधिकार.**

निरसन. **५२.** (१) हज समिती अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५१) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अधिनियमांन्वये घटित केलेली हज समिती, जोपर्यंत या अधिनियमान्वये समिती स्थापन होत नाही तोपर्यंत, जणू काही हा अधिनियम संमत झाला नाही असे समजून काम करणे चालू ठेवील आणि अशी समिती स्थापन झाल्यानंतर, कलम ५ अन्वये अधिसूचना काढल्यावर पूर्वीची समिती विसर्जित होईल.

(३) असे निरसन झाले असले तरीही, हज समिति अधिनियम, १९५९ (१९५९ चा ५१) अन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कारवाई ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये केलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

[कलमे ४ (दोन) व ४१ (१) पहा]

**क्षेत्र-एक.** दिल्ली, राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्र, राजस्थान, जम्मू व काश्मीर, पंजाब, हरयाणा, हिमाचल प्रदेश आणि चंदीगढ संघ राज्यक्षेत्र.

**क्षेत्र-दोन.** उत्तरप्रदेश, बिहार, उत्तरांचल व झारखंड.

**क्षेत्र-तीन.** आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, छत्तीसगढ आणि ओरिसा.

**क्षेत्र-चार.** आसाम, पश्चिम बंगाल, त्रिपुरा, मणिपूर, सिक्कीम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, नागालँड आणि अंदमान व निकोबार बेटे संघ राज्यक्षेत्र.

**क्षेत्र-पाच.** महाराष्ट्र, गुजरात, गोवा आणि दमण व दीव आणि दादरा व नगरहवेली ही संघ राज्यक्षेत्रे.

**क्षेत्र-सहा.** तामिळनाडू, केरळ, कर्नाटक आणि पाँडिचरी व लक्षद्वीप ही संघ राज्यक्षेत्रे.

# THE HAJ COMMITTEE ACT, 2002

## हज समिती अधिनियम, २००२

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acquire | संपादन | [section 17 (*2*)] |
| act in the interest of | हिताची कृती करणे | [section 23 (viii) (b)] |
| aggrieved person | व्यथित व्यक्ती | [section 42] |
| charges and expenses incidental | आनुषंगिक आकार व खर्च | [section 31 (b)] |
| charitable trust | धर्मादाय न्यास | [section 17 (*2*)] |
| common seal | सामाईक मोहोर | [section 3(*2*)] |
| contiguous states | शेजारची राज्ये | [section 44 (x)] |
| delegate | प्रत्यायोजित करणे | [section 46 ] |
| disadvantage | अहित | [section 48 First Proviso] |
| dispose | विल्हेवाट लावणे | [section 17 (*2*)] |
| disqualified | अनर्ह | [section 12] |
| disseminate | प्रसारित करणे | [section 9 (*1*) (i)] |
| embarkation point | यात्रा प्रारंभाचे ठिकाण | [section 9 (*1*) (ii)] |
| endowment | दाननिधी | [section 3 (*2*)] |
| foreign exchange | परकीय चलन | [section 9 (*1*) (ii)] |
| grievance | गाऱ्हाणी | [section 42] |
| Haj pilgrim travel pass | हज यात्रेकरूंना प्रवासाचा परवाना. | [section 30 (a) (ii)] |
| Haj season | हजचा हंगाम | [section 10 (*1*)] |
| hold | धारण करणे | [section 17 (*2*)] |
| in session | सत्रासीन | [section 44 (*3*)] |
| indemnity | हानिरक्षण | [section 40] |
| inoculation | लस टोचणे | [section 9 (*1*) (ii)] |
| invalid | विधिअग्राह्य | [section 38] |
| medical inspection | वैद्यकीय तपासणी | [section 9 (*1*) (ii] |
| moral turpitude | नैतिक अध:पतन | [section 23 (vii)] |
| muslim theology | मुस्लिम धर्मशास्त्र | [section 18 (*1*) (iii)] |
| obligations and liabilities | आबंधने व दायित्वे | [section 43 (*3*)] |
| orientation | दिशानिदेशन | [section 9 (*1*) (i)] |
| outgoing | मावळता | [section 22 (*2*)] |

| | | |
|---|---|---|
| panel | नामिका | [section 16 (*1*)] |
| pilgrim | यात्रेकरू | [section 2 (f)] |
| pilgrim pass | यात्रेकरू परवाना | [section 35 (*1*)] |
| previous sanction | पूर्वमंजुरी | [section 29 (*4*)] |
| proceedings of the committee | समितीची कार्यवृत्ते | [section 9 (*1*)(viii)] |
| reconstitution of committee | समिती पुनर्घटित करणे | [section 8 (*1*)] |
| remuneration | पारिश्रमिक | [section 48] |
| renewal | नवीकरण | [section 17 (*3*)] |
| State Haj Fund | राज्य हज निधी | [section 32 ] |
| supersession | निष्प्रभावन | [section 36 (*1*)] |
| transit accommodation | तात्पुरती निवासव्यवस्था | [section 27 (*2*)] |
| travel document | प्रवासी दस्तऐवज | [section 35 (*1*)] |
| undischarged insolvent | अमुक्त नादार | [section 12 (Five)] |
| unsound mind | विकल मन | [section 23 (v)] |
| vaccination | लसीकरण | [section 9 (*1*) (ii)] |

# हज समिती अधिनियम, २००२

# THE HAJ COMMITTEE ACT, 2002

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अनर्ह | disqualified | [कलम १२] |
| अमुक्त नादार | undischarged insolvent | [कलम १२ (पाच) ] |
| अहित | disadvantage | [कलम ४८ पहिले परंतुक.] |
| आनुषंगिक आकार व खर्च | charges and expenses incidental | [कलम ३१ (ख)] |
| आबंधने व दायित्वे | obligations and liabilities | [कलम ४३ (३) ] |
| गाऱ्हाणी | grievance | [कलम ४२] |
| तात्पुरती निवासव्यवस्था | transit accommodation | [कलम २७ (२)] |
| दाननिधी | endowment | [कलम ३ (२)] |
| दिशानिदेशन | orientation | [कलम ९ (१) (एक) ] |
| धर्मादाय न्यास | charitable trust | [कलम १७ (२)] |
| धारण करणे | hold | [कलम १७ (२)] |
| नवीकरण | renewal | [कलम १७ (३)] |
| नामिका | panel | [कलम १६ (१)] |
| निष्प्रभावन | supersession | [कलम ३६ (१)] |
| नैतिक अध:पतन | moral turpitude | [कलम २३ (सात)] |
| परकीय चलन | foreign exchange | [कलम ९ (१) (दोन)] |
| पारिश्रमिक | remuneration | [कलम ४८] |
| पूर्वमंजुरी | previous sanction | [कलम २९ (४)] |
| प्रवासी दस्तऐवज | travel document | [कलम ३५ (१)] |
| प्रसारित करणे | disseminate | [कलम ९ (१) (एक)] |
| प्रत्यायोजित करणे | delegate | [कलम ४६ ] |
| मावळता | outgoing | [कलम २२ (२)] |
| मुस्लिम धर्मशास्त्र | muslim theology | [कलम १८ (१) (तीन)] |
| यात्रा प्रारंभाचे ठिकाण | embarkation point | [कलम ९ (१) (दोन)] |
| यात्रेकरू | pilgrim | [कलम २ (च)] |
| यात्रेकरू परवाना | pilgrim pass | [कलम ३५ (१)] |
| राज्य हज निधी | State Haj Fund | [कलम ३२ ] |
| लस टोचणे | inoculation | [कलम ९ (१) (दोन)] |
| लसीकरण | vaccination | [कलम ९ (१) (दोन)] |
| विकल मन | unsound mind | [कलम २३ (पाच)] |

**मराठी-इंग्रजी शब्दसूची**

| | | |
|---|---|---|
| विधिअग्राह्य | invalid | [कलम ३८] |
| विल्हेवाट लावणे | dispose | [कलम १७ (२)] |
| वैद्यकीय तपासणी | medical inspection | [कलम ९ (१) (दोन)] |
| व्यथित व्यक्ती | aggrieved person | [कलम ४२] |
| शेजारची राज्ये | contiguous states | [कलम ४४ (भ)] |
| समितीची कार्यवृत्ते | proceedings of the committee | [कलम ९ (१)(आठ)] |
| समिती पुनर्घटित करणे | reconstitution of committee | [कलम ८ (१)] |
| सत्रासीन | in session | [कलम ४४ (३)] |
| सामायिक मोहोर | common seal | [कलम ३ (२)] |
| संपादन करणे | acquire | [कलम १७ (२)] |
| हजचा हंगाम | Haj season | [कलम १० (१)] |
| हज यात्रेकरूंना प्रवासाचा परवाना. | Haj pilgrim travel pass | [कलम ३० (क) (दोन)] |
| हानिरक्षण | indemnity | [कलम ४०] |
| हिताची कृती करणे | act in the interest of | [कलम २३ (आठ) (ख)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई